# जिल्हा परिषद लातूर

## ग्रामपंचायत विभाग

## १. विभागाची माहिती

### १.१ परिचय

ग्रामपंचायत विभाग हा जिल्हा परिषदेमधील विभागांपैकी एक महत्त्वाचा विभाग आहे. ग्रामपंचायत विभाग अंतर्गत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना (MGNREGA) व निर्मल भारत अभियान (स्वच्छ भारत मिशन) या महत्त्वाच्या योजना राबविल्या जातात. तसेच विस्तार अधिकारी (पंचायत), विस्तार अधिकारी (सामाजिक), ग्रामविकास अधिकारी आणि ग्रामसेवक संवर्गाच्या आस्थापना देखील विभागामार्फत सांभाळल्या जातात.

ग्रामपंचायती स्वावलंबी होवून त्यांना स्वायत्त संस्थाप्रमाणे आपला कारभार करण्याचे सामर्थ्य प्राप्त व्हावे म्हणून केंद्र शासनाने ७३ वी घटना दुरुस्ती केली आहे. या दुरुस्तीनुसार ग्रामपंचायतींना घटनात्मक दर्जा प्राप्त झाला आहे. ग्रामपंचायतींची वाटचाल गावातील लोकांना सामाजिक न्याय मिळावा आणि त्यांचा आर्थिक विकास व्हावा या दिशेने सुरू आहे.

देशाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी केंद्र शासनाकडून विविध प्रकारच्या योजना राबविण्यात येत आहेत. विकास योजनांचा लाभ तळागाळातील माणसाला मिळावा व त्यांची उन्नती/प्रगती व्हावी यासाठी सत्तेचे विकेंद्रीकरण करून जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतींना अधिकार देण्यात आले आहेत.

### १.२ व्हिजन आणि मिशन

- ग्रामपंचायती स्वायत्त आणि सक्षम बनविणे.

- गावांच्या सर्वांगीण विकासासाठी शाश्वत योजना राबविणे.

- पारदर्शक व उत्तरदायित्व असलेले प्रशासन.

- नागरिकांना दारापर्यंत सेवा पुरविणे.

## २. उद्दिष्टे व कार्ये

- ग्रामपंचायतींच्या सक्षमीकरणासाठी निधीचे व्यवस्थापन.

- ग्रामसभा व ग्रामपंचायत कामकाजाचे नियोजन व अंमलबजावणी.

- पंचायत समित्यांमार्फत विविध योजना राबविणे.

- सरपंच, उपसरपंच, सदस्य यांचे प्रशिक्षण व मार्गदर्शन.

- विस्तार अधिकारी, ग्रामविकास अधिकारी, ग्रामसेवक यांच्या आस्थापना व प्रशासकीय कामकाजाची जबाबदारी.

### ३. प्रशासकीय रचना

- मुख्य कार्यकारी अधिकारी.

- उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत).

- गट विकास अधिकारी.

- सहाय्यक गट विकास अधिकारी.

- विस्तार अधिकारी (पंचायत/सामाजिक).

- ग्रामविकास अधिकारी/ग्रामसेवक.

- इतर सहाय्यक कर्मचारी.

### ४. अधिकारी संपर्क माहिती (Who’s Who)

नाव § श्री. बी. डी. वाघ.

पदनाम § उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत).

ई-मेल § dyceovplatur@gmail.com.

फोन नं § ०२३८२-२४५३१२.

पत्ता § जिल्हा परिषद लातूर, मुख्य प्रशासकीय इमारत, खोली क्र. ००६.

### ५. नागरी सेवा व सुविधा

- जन्म, मृत्यू, विवाह दाखले.

- दारिद्र्य रेषेखालील प्रमाणपत्र.

- थकबाकी नसल्याचा दाखला.

- निराधार योजनेसाठी वयाचा दाखला.

- नमुना ८ असेसमेंट दाखला.

- ई-ग्रामसॉफ्ट व आपले सरकार सेवा केंद्राद्वारे सेवा.

## ६. योजना व उपक्रम

### ६.१ केंद्र शासन योजना

- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (MGNREGA).

- जल जीवन मिशन अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजना.

- राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियान (RGSA).

- १५ वा वित्त आयोग निधी योजना.

### ६.२ राज्य शासन योजना

- ग्रामपंचायत जनसुविधा योजना.

- नागरी सुविधा योजना.

- आर. आर. आबा पाटील सुंदर गाव पुरस्कार योजना.

- अल्पसंख्यांक बहुल ग्रामपंचायत विकास योजना.

## ७. आर. आर. (आबा) पाटील सुंदर गाव पुरस्कार योजना

- ग्रामस्वच्छता, नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन व पर्यावरण संवर्धन.

- सामाजिक दायित्व, ऊर्जा वापर, पारदर्शकता व ग्रामविकास योजनांची अंमलबजावणी.

- तालुका आणि जिल्हास्तरावरील सुंदर गाव निवड व पुरस्कार वितरण.

## ८. अल्पसंख्यांक बहुल ग्रामपंचायत क्षेत्र विकास

- अल्पसंख्यांक बहुल गावांमध्ये पायाभूत सुविधा निर्माण करणे.

- कब्रस्तान, सभागृह, जलसंधारण व सार्वजनिक स्वच्छता सुविधा प्रदान करणे.

- ग्रामसभेच्या निर्णयानुसार कामे निश्चित करणे.

## ९. माहितीचा अधिकार (RTI)

प्रथम अपील अधिकारी § श्री. बी. डी. वाघ.

जन माहिती अधिकारी § सहाय्यक गट विकास अधिकारी.

सहाय्यक जन माहिती अधिकारी § विस्तार अधिकारी (पंचायत).

## १०. नागरिकांची सनद

- पारदर्शक व उत्तरदायित्वपूर्ण प्रशासन.

- त्वरित व कार्यक्षम सेवा.

- ग्रामसभा व नागरिक तक्रारींचे त्वरित निराकरण.

- नागरी सेवा वेळेत उपलब्ध करणे.